**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**

क्र. : मुमाआ-२०२१/नों. क्र.९७००/त. क्र.७८/२४/०१

प्रति,
श्री. संतोषकुमार रामप्रसाद पांडे
२/१७, प्रदीप मेन्शन, गणेश गल्ली, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड
लालबाग, मुंबई-४०० ०१२.

जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी जी/दक्षिण विभाग
बृ.मुं.म.पा. सहाय्यक आयुक्त, जी/द. विभाग यांचे कार्यालय,
५ वा मजला, धनमिल कंपाऊंड, एन.एम.जोशी मार्ग, परेल, मुंबई-४०० ०१३.

| | | |
|---|---|---|
| तक्रारीचा दिनांक | : | २३-०८-२०२१ |
| सुनावणीचा दिनांक | : | ०२-०४-२०२४ |
| तक्रारदार | : | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

तक्रारदार यांनी द्वितीय अपील क्र. मुमाआ/नों.क्र.५४३९/१९/अ.क्र.२४०८/२० मध्ये न. भू. क्र. ११० जी/दक्षिण लोअर परेल विभाग, मुंबई शहर म जरेकर मार्ग, गांधी नगर वरळी मुंबई- ४०० ०१८. परेल लोकसेवा सहकारी गृहनिर्माण संस्था जमिनीवरील योजनचे परिशिष्ट-२ मा. सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण कार्यालयाने सन २००९ साली निर्गमित करण्यात आले तसेच दिनांक ०७.०१.२०१७ रोजी पुरवणी परिशिष्ट २ पारित करुन १६ झोपडीधारकांचे झोपडया नव्याने समाविष्ट करण्यात आले असून त्याबाबत सविस्तर माहिती/छायांकित कागदपत्रांची माहिती मागितलेली असून राज्य माहिती आयोगाने दि. २५-०२-२०२१ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी जी/दक्षिण विभाग श्री. राज मोहिते यांना असे आदेश दिले होते की, अपिलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ही त्रयस्थ पक्षाची माहिती असेल तर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ११ (१) नुसार त्रयस्थ पक्षांना माहिती अपिलकर्ता यांना देण्याबाबत त्यांचा काही आक्षेप आहे किंवा नाही विचारण्यात यावे. त्रयस्थ पक्षाचा जर काही आक्षेप नसेल तर माहिती देण्यात यावी. जर आक्षेप असेल आणि अपिलकर्ता यांना जनहित सिध्द करता आले असेल तर माहिती देण्यात यावी आणि अपिलकर्ता यांना जन माहिती सिध्द करता आले नसेल तर त्रयस्थ पक्षांची माहिती देऊ नये, ही संपूर्ण प्रक्रिया ३० दिवसात पूर्ण करण्यात यावी.

तथापि अद्याप माहिती मिळाली नसल्याने तक्रारदार यांनी दि.२३-०८-२०२१ रोजी आयोगापुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारदार, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी श्री.अनिल पवार उपस्थित. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारदार यांनी दि.२०-०८-२०१९ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांना मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाची असेल तर माहिती अपिलकर्त्याला देण्याबाबत आक्षेप विचारावा त्रयस्थ पक्षाने आक्षेप नसेल तर माहिती द्यावी या आदेशाप्रमाणे माहिती दिलेली नाही.

अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलकर्ता यांना जनहित सिध्द करता आले असेल तर माहिती देण्यात यावी आणि अपिलकर्ता यांना जन माहिती सिध्द करता आले नसेल तर त्रयस्थ पक्षांची माहिती देऊ नये, ही संपूर्ण प्रक्रिया ३० दिवसात पूर्ण करण्यात यावी असे आयोगाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी केलेली नाही.

सुनावणीचया वेळी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी श्री.अनिल पवार यांनी सूचित केले की, आयोगाचे आदेशावेळी श्री.राजेंद्र मोहिते वसाहत अधिकारी (सध्या वसाहत अधिकारी एम/पूर्व येथे कार्यरत) होते. त्यांनी केलेल्या कार्यवाहीबद्दलचे अभिलेख उपलब्ध नाहीत.

सबब, आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

## अंतरिम आदेश

१. तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी जी/दक्षिण यांनी माहिती अर्जावर काहीही कार्यवाही केलेली नाही आणि त्याबाबतचा समर्पक खुलासा सुध्दा आयोगास सादर केला नाही. त्यामुळे अधिनियमाच्या कलम ७ (१) चा भंग केलेला असल्याने त्यांचे विरुध्द कलम २० (१) नुसार रुपये २५०००/- (रुपये पंचवीस हजार) दंड का करु नये ? याबाबत खुलासा सादर करण्यास अंतिम संधी देण्यात येत आहे. सबब, याबाबतचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्ती पासून १५ दिवसाच्या आत सादर करावा, अन्यथा, अपिलार्थीस जाणुनबुजून माहिती दिली नाही, असे समजून दंडात्मक कारवाई कायम करण्यात येईल.

२. तक्रारदाराचा तक्रार अर्ज मान्य करण्यात येत आहे.

मुंबई
दिनांक : ०२-०४-२०२४

( समीर सहाय )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

State Information Commission
Maharashtra